**जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न** *
-------------------------

**लेझीम स्पर्धेतून सामाजिक संदेश***

ठाणे दि ०९ जानेवारी २०१९ : जिल्हा परिषद शाळांच्या मुलांमधील क्रीडा कौशल्य गुणांना वाव मिळावा या हेतूने दरवर्षी घेण्यात येणाऱ्या जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा ८ जानेवारी रोजी बदलापूर येथील आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या प्रांगणात संपन्न झाल्या. तत्पूर्वी या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी शिक्षणाधिकारी संगीता भागवत उपस्थित होत्या.

जिल्हा परिषद अध्यक्ष मंजुषा जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक भीमनवार यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी जिल्हा परिषद शाळांच्या मुलांमधील क्रीडा कौशल्य लहान वयातच शिक्षकांनी हेरुन मुलांना गुणवंत खेळाडू होण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुभाष पवार यांनी केले.

या स्पर्धेमध्ये -खो, खो, कबड्डी, लंगडी, लेझीम, संगीत खुर्ची, रिले, ५० आणि १०० मीटर धावणे, लांब उडी आदि क्रीडा प्रकार खेळवण्यात आले. यामध्ये मुलं आणि मुलींच्या स्वतंत्र गटात स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या संघाना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. या वेळी जिल्हा परिषदेच्या सदस्या पुष्पा गणेश पाटील, आदर्श शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष रघुनाथ पाटील, विस्तार अधिकारी प्राजक्ता राऊत उपस्थित होते.लेझीम स्पर्धेतून सामाजिक संदेश

या वेळी पाच तालुक्याततून आलेल्या लेझीम प्रात्यक्षिकांचे उपाध्यक्ष पवार , शिक्षणाधिकारी भागवत यांच्याबरोबर मान्यवरांनी कौतूक केले. शेती राखा , प्रदूषण रोखा, मुलगी वाचवा असे विविध विषय देत शहापूर, मुरबाड तालुक्यासह विविध पथकांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धेचा अंतिम निकाल खालील प्रमाणे

खो खो (मुले)
प्रथम - जि प शाळा अजनुप (शहापूर)
द्वितीय - जि प शाळा टाकीचीवाडी (मुरबाड)
तृतीय -जि प शाळा नारेन (अंबरनाथ)
खो खो (मुली)
प्रथम - जि प शाळा अजनुप (शहापूर)
द्वितीय - जि प शाळा बोराडापाडा (अंबरनाथ)
तृतीय -जि प शाळा टाकीचीवाडी (मुरबाड)
कबड्डी (मुले)
प्रथम - जि प शाळा नेवाळी (अंबरनाथ)
द्वितीय - जि प शाळा शहापूर नं १ (शहापूर)
तृतीय- जि प शाळा कुंदे (भिवंडी)
कबड्डी (मुली)

द्वितीय - जि प शाळा देवरुंग (भिवंडी)
तृतीय - जि प शाळा नेवाळी (अंबरनाथ)
लंगडी (मुले)
प्रथम - जि प शाळा कुहे (भिवंडी)
द्वितीय - जि प शाळा टाकीचीवाडी (मुरबाड)
तृतीय- जि प शाळा वेहलोली बु (शहापूर)
लंगडी (मुली)
प्रथम - जि प शाळा माहुली (शहापूर)
द्वितीय - जि प शाळा कुहे (भिवंडी)
तृतीय -जि प शाळा पिंपरी (कल्याण)
लेझीम
प्रथम - ( भिवंडी)
द्वितीय - (शहापूर)
तृतीय- (कल्याण)
चतुर्थ- (मुरबाड)
उत्तेजनार्थ - (अंबरनाथ)
रिले शर्यत (मुले)
प्रथम - जि प शाळा अस्नोली (शहापूर)
द्वितीय - जि प शाळा कासगाव (अंबरनाथ)
तृतीय - जि प शाळा किशोर (मुरबाड)
रिले (मुली)
प्रथम - जि प शाळा अस्नोली (शहापूर)
द्वितीय - जि प शाळा डोंगरन्हावे (मुरबाड)
तृतीय - जि प शाळा खरीवली (भिवंडी)
संगीत खुर्ची (मुले)
प्रथम - (शहापूर)
द्वितीय - (कल्याण)
तृतीय - (मुरबाड)
संगीत खुर्ची (मुली)
प्रथम - कल्याण
द्वितीय - केळीचा पाडा (शहापूर)
तृतीय - अंबरनाथ
५० मीटर धावणे (मुले)
प्रथम - जि प शाळा अल्याणी (शहापूर)
द्वितीय - (भिवंडी)
तृतीय - (अंबरनाथ)
५० मीटर धावणे (मुली)

प्रथम – (मुरबाड)
द्वितीय – (शहापूर)
तृतीय – (कल्याण)
१०० मीटर धावणे (मुले)
प्रथम – जि प शाळा विहिगाव (शहापूर)
द्वितीय – (मुरबाड)
तृतीय – (कल्याण)
१००मीटर धावणे (मुली)
प्रथम – जि प शाळा साखरोली (शहापूर)
द्वितीय – (मुरबाड)
तृतीय – (कल्याण)

लांब उडी (मुले)
प्रथम – जि प शाळा विहिगाव (शहापूर)
द्वितीय – (मुरबाड)
तृतीय – (भिवंडी)
लांब उडी (मुली)
प्रथम – (मुरबाड)
द्वितीय – (कल्याण)
तृतीय – (भिवंडी)

